जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण
जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे
टोल फ्री क्रमांक :१०७७ दुरध्वनी क्रमांक :०२०-२६१२३३७१, Email id - collector.pune@maharashtra.gov.in

जि.का./क्रं.आ.व्य./कावि/ १५८ /२०२१ दिनांक :-१८ /०२/२०२१

वाचले:

१. भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम, १८९७,
२. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५.
३. आपत्तीव्यवस्थापनकायदा २००५ चे कलम ३० , ३३ , ३४ , ४१ व कलम ५१,
४. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील क्रमांक करोना २०२०/ग. प्र. ५८/आरोग्य-५, दिनांक १३/०३/२०२०.१४/०३/२०२० तसेच १५/०३/२०२० रोगीच्या अधिसुचना.
५. महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसुचना No.DMU/२०२०/CR.९२/DisM-१ दिनांक २३ व २४ मार्च २०२०.
६. मुख्य सचिव, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील No. DMU/२०२०/CR.९२/DisM-1. दिनांक ३०/१०/२०२० रोजीचे आदेश.
७. उप सचिव, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय (विस्तार), मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्रं- संकीर्ण ८२२०/ प्र.क्र.२२४/सा.का.४, दि.०५/०१/२०२१.
८. मुख्य सचिव, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील No. DMU/२०२०/CR.९२/DisM-1. दिनांक 29/01/2021 रोजीचे आदेश.
९. या कार्यालयाकडील आदेश क्रं.जि.का./क्रं.आ.व्य./कावि/१७९४/१८१८/२३९९/२३८८/२८६५/२०२० दि.२३ जुन २०२०, दि. २५ जुन २०२०, दि.२८ ऑगस्ट. २०२०, दि.२६ ऑगस्ट २०२०, दि.२३ सप्टेंबर २०२०,
१०. या कार्यालयाकडील आदेश क्रं.जि.का./क्रं.आ.व्य./कावि/२५१४/२०२० दि.०४ सप्टेंबर २०२०
११. मा. विभागीय आयुक्त पुणे विभाग पुणे यांचेकडील परिपत्रक क्रं.सा.प्र.२/आरआर/५१/२०२१, दि.०५.०१.२०२१
१२. मा. मुख्यमंत्री आणि मा. उपमुख्यमंत्री महोदयांचे अध्यक्षतेखाली दि. १६ फेब्रुवारी २०२१ रोजीचे व्ही. सी. मधील सूचना
१३. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील क्रं.कोरोना-२०२०/सीआर क्रं.८५/अेअे-५ दि.१७.०२.२०२१

जिल्हाधिकारी पुणे

**विषय :- कोव्हीड-१९ विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनांच्या अनुषंगाने पारीत केलेले आदेश, निर्देश, SOP इत्यादींचे प्रभावी अंमलबजावणीबाबत.**

**आदेश:**

**ज्याअर्थी,** उपरोक्त वाचा. २ चे अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र कोव्हीड १९ उपाययोजना नियम, २०२० प्रसिद्ध केले असून यातील नियम क्रं. ३ नुसार कोरोना विषाणुमुळे (COVID-१९) उदभलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण यासाठी जिल्हाधिकारी यांना त्याचे कार्यक्षेत्रात सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे.

**ज्याअर्थी,** संदर्भ क्रं.4 च्या अनुषंगाने संदर्भ क्र.९ अन्वये पुणे जिल्हयात कोव्हिड- १९ या विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी लॉकडाऊनच्या कालवधी दिनांक २८ फेब्रुवारी २०२१ पर्यंत वाढविला आहे व लॉकडाऊनच्या कालावधीत करावयाच्या कार्यवाहीबाबत संदर्भ क्रं.४ ते ९ मध्ये नमूद आदेशान्वये तसेच या कार्यालयाने वेळोवेळी पारित केलेल्या आदेशान्वये सविस्तर मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत.

**त्याअर्थी,** मी राजेश देशमुख, जिल्हाधिकारी पुणे तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पुणे कोव्हीड-१९ विषयी मा. मुख्यमंत्री आणि मा.उपमुख्यमंत्री महोदयांचे अध्यक्षतेखाली दि.१६ फेब्रुवारी २०२१ रोजी राज्यातील सर्व विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांच्यासमवेत झालेल्या व्हीडीओ कॉन्फरन्समध्ये देण्यात आलेल्या सूचनांच्या अनुषंगाने पुणे जिल्हयात खालील प्रमाणे तात्काळ कार्यवाही करणेबाबत आदेशित करीत आहे.

Scanned with CamScanner

१. Incident Commander तथा उपविभागीय अधिकारी व तहसिलदार, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पोलीस निरीक्षक, मुख्याधिकारी, नगर परिषद यांनी त्यांच्या अधिकारक्षेत्रातील सर्व मंगल कार्यालये, हॉल, लॉन्स, कोचिंग क्लासेस, खाजगी शाळा, अनुदानित व विनाअनुदानित शाळा / विद्यालय, महाविद्यालय, नाट्यगृह, चित्रपटगृहे, व्यायामशाळा, शॉपिंग मॉल्स, धार्मिक स्थळे, उद्याने, व इतर गर्दी होणारी स्थळे या ठिकाणी वेळोवेळी अचानक भेट देऊन तपासणी करावी. सदर ठिकाणी प्रमाणित कार्यप्रणाली (SOP) मधील मर्यादेपेक्षा जास्त संख्येत लोक उपस्थित असतील, उपस्थित लोकांनी चेहऱ्यावर मास्क परिधान केलेले नसतील, हँड सॅनिटायझरची उचित व्यवस्था नसेल, त्यांना प्रथम वेळी नोटीस देऊन उचित दंड आकारावा, नोटीस देताना पुढील तपासणीत हीच परिस्थिती राहिली तर गुन्हा दाखल करण्यात येईल असा स्पष्ट उल्लेख नोटीस मध्ये करावा. त्याच ठिकाणी दुस-या वेळेस जर अशीच परिस्थिती राहिली तर सदर प्रतिष्ठान १५ दिवसाकरिता सील करण्याची कार्यवाही करावी अथवा संबंधित प्रतिष्ठानावर पोलीस विभागाने गुन्हा दाखल करावा. तसेच सार्वजनिक ठिकाणी नाक व तोंडावर मास्क न वापरणा-या व्यक्तीवर प्रथम वेळी रु. ५००/- व पुन्हा आढळल्यास रु. १०००/- एवढा दंड आकारावा.

२. पुणे जिल्हा ग्रामीण कार्यक्षेत्रात वरील प्रमाणे निश्चित करणेत आलेल्या दंडाची वसुली ग्रामस्तरावरील ग्रामसेवक / ग्रामपंचायत तसेच पोलीस अधिक्षक पुणे ग्रामीण यांनी नेमुण दिलेल्या पोलीस अधिकारी/कर्मचारी यांनी करावी.

३. सर्व हॉटेल, रेस्टॉरंट - उपहारगहे, बॅक्वेट हॉल इ. ठिकाणी नागरिकांना संचार करताना मास्क व सॅनिटाझर वापर करणे बंधनकारक राहील त्याबाबत संबंधीत विभागाने नेमणूक केलेल्या पथकाने विशेष मोहिम राबवुन तपासणी करावी. सदर ठिकाणी नियमांचे उल्लंघन झाल्यास संबंधीत विभागाने कठोर करवाई करावी.

४. गर्दी होणारे कोणतेही खाजगी अथवा सार्वजनिक कार्यक्रम आयोजित करण्यापूर्वी संबंधीत पोलीस स्टेशन मधून रितसर परवानगी प्राप्त करुन घेणे अनिवार्य राहील. तसेच कार्यक्रमस्थळी ठिकाणी कोविड-१९ निर्देशांचे पालन होते किंवा नाही, याबाबतीत आयोजकांवर बंधनकारक राहील. कोव्हीड- १९ संदर्भातील तरतुदींचे कोणतेही उल्लघंन आढळुन आल्यास साथरोग अधिनियम आणि तत्सम कायदेशीर तरतुदीनुसार संबधित स्थानिक पोलीस स्टेशन मार्फत कारवाई करावी.

५. पुणे जिल्हा ग्रामीण कार्यक्षेत्रातील नगरपालिका / नगरपरिषद/ नगरपंचायत/ ग्रामपंचायत तसेच छावणी परिषद हद्दीतील पॉझिटिव्ह रुग्ण आलेला परिसर प्रतिबंधित क्षेत्र (कंटेनमेंट झोन) घोषित करणेची कार्यवाही संबधित Incident Commander यांनी करावी. तसेच संबधित ठिकाण निर्जंतुकीकरण स्थानिक स्वराज्य संस्थेने करावे. जेणेकरुन संसर्गाचा प्रसार रोखणे सोपे होईल.

६. जिल्ह्यातील कोणते सीसीसी सेंटर बंद आहेत व कोणते सीसीसी सेंटर चालू करावे लागणार आहेत यासंबंधीची पूर्वतयारी करावी. वाढती रुग्ण संख्या विचारात घेवुन संबधित आवश्यक कोव्हिड केअर सेंटर, कोव्हिड हॉस्पीटल, कोव्हिड केअर हॉस्पीटमध्ये पुरेशा खाटा उपलब्ध राहतील, सर्व उपकरणे सुस्थितीत असतील याची खातरजमा संबंधीतांनी करावी व पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध ठेवावे.

७. पुणे जिल्हा ग्रामीण कार्यक्षेत्रातील नगरपालिका/नगरपरिषद/नगरपंचायत/ग्रामपंचायत व छावणी परिषद हद्दीतील आरोग्य विभागाने कोरोनाचा संसर्ग वाढत असेल त्या भागात किंवा परिसरात टार्गेटेड पद्धतीने तपासण्या कराव्यात. प्रत्येक रुग्णांचे किमान २० तरी संपर्क शोधलेच पाहिजेत. ज्या भागात कोरोनाचा रुग्ण सापडला असेल त्या ठिकाणी निदान मायक्रो सिलिंग तरी करावे. पेशंटच्या घरातील सर्वांची कोविड तपासणी करावी. वेगाने प्रसार करणाऱ्या (सुपर स्पेडर) संवर्गातील व्यक्तीची वारंवार तपासणी करुन सकारात्मक चाचणी आल्यास विलगिकरण कक्षा ठेवावे. भाजी मंडई, दुकानदार अशा लोकांच्या ठराविक अंतराने नियमित कोरोना चाचण्या

Scanned with CamScanner

कराव्यात, सर्व सामाजिक, धार्मिक व राजकीय कार्यक्रम घेताना शासनाने ठरवून दिलेल्या SOP प्रमाणेच कार्यवाही करणे बंधनकारक असेल.

८. जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी जि. प. पुणे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी, न.प./न.पा./न.पं. यांनी अध्यक्ष, इंडियन मेडिकल असोसिएशन यांचे समवेत सर्व खाजगी प्रक्टिस करणा-या डॉक्टरांची बैठक आयोजित करावी. सदर बैठकीत ज्या रुग्णांना सर्दी, ताप, खोकला अशी लक्षणे असतील व त्यांना असे वाटत असेल की रुग्णाला कोव्हिड-१९ रोगाची प्राथमिक लक्षणे दिसून येत आहेत तर त्यांनी अशा रुग्णांना ताबडतोब कोव्हिड-१९ ची टेस्ट करुन घेण्यासंबंधीच्या सूचना द्याव्यात. तसेच जिल्ह्यास उपलब्ध असलेले सर्व व्हेंटिलेटर्स चालू आहेत किंवा कसे याची खात्री करून घ्यावी. सार्वजनिक ठिकाणी मास्कचा वापर करणे, सामाजिक अंतर ठेवणे, ठराविक अंतराने, हात साबणाने स्वच्छ धुणे याविषयी व्यापक प्रमाणात जनजागृती करावी.

९. सर्व आगार प्रमुख, राज्य परिवहन महामंडळ जिल्हा पुणे यांनी बस स्थानकांवर तसेच बसेस मध्ये प्रवाशांकडून मास्कचा वापर व कोव्हीड-१९ च्या प्रतिबंधात्मक उपाययोजनांचे पालन होण्याकरिता आवश्यक कार्यवाही करावी आणि बसेसच्या चालक व वाहकांनाही त्याअनुषंगाने आवश्यक त्या सूचना द्याव्यात.

१०. सर्व Incident Commander यांनी त्यांचे अधिनस्थ असलेल्या सीसीसी सेंटर मधील कोव्हीड-१९ च्या अनुषंगाने उपलब्ध झालेली साधनसामुग्री सुस्थितीत असल्याची खात्री करुन उपरोक्त सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

११. पोलीस विभाग, Incident Commander, नगर परिषद, नगरपालिका, नगरपंचायत, ग्रामपंचायत व छावणी परिषद यांनी मास्क वापराच्या सक्तीची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी संयुक्त पथकांची स्थापना करून सार्वजनिक ठिकाणी तसेच रस्त्यांवरुन जाणा-या वाहनांची तपासणी करावी व सार्वजनिक ठिकाणी मास्क न वापरणा-या व्यक्तीवर, वाहनधारकांवर दंडात्मक कार्यवाही करावी.

१२. कोव्हिड-१९ च्या वाढत्या संसर्गाच्या पार्श्वभूमीवर पुणे जिल्हयातील ग्रामीण कार्यक्षेत्रातील मोठया संख्येने मंदिरामध्ये दर्शनासाठी येणा-या भाविकांबाबत संबधित मंदीराचे व्यवस्थापक संस्थान यांनी याबाबत आवश्यक कार्यवाही करावी. तसेच पास देताना ६५ वर्षावरील ज्येष्ठ नागरिक व १० वर्षाखालील लहान मुले यांना तसेच मास्क न वापरणा-या भाविकांना पासेस देण्यात येऊ नयेत. तसेच धार्मिक स्थळे / प्रार्थनास्थळे याठिकाणी करावयाच्या कार्यवाहीबाबतच्या SOP चे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

१३. शासकीय कार्यालयांमध्ये अभ्यागतांची गर्दी होऊ नये त्याअनुषंगाने सर्व शासकीय कार्यालय प्रमुखांनी नोडल अधिकारी यांची नियुक्ती करावी. सदर नोडल अधिकारी यांनी कार्यालयामध्ये येणा-या अभ्यागतांना पुन्हा दुस-या दिवशी कार्यालयामध्ये येण्याची आवश्यकता भासू नये व कार्यालयामध्ये अभ्यागतांची गर्दी होऊ नये याअनुषंगाने त्यांची निवेदने ,अर्ज यांवर तात्काळ आवश्यक कार्यवाही करावी.

१४. सद्यस्थितीत सार्वजनिक परिवहन व्यवस्था (रेल्वे, बस इ) द्वारे प्रवाशांची जिल्हांतर्गत तसेच आंतरजिल्हा / आंतरराज्य आवक-जावक सुरू झालेली असल्याने अशा प्रकारे प्रवास करुन आलेल्या प्रवाशांनी ताप, सर्दी, खोकला इ. कोव्हिड-१९ सदृश लक्षणे दिसून आल्यास तात्काळ स्वत:हून गृह विलगीकरणात (Home Quarantine) रहावे व तात्काळ कोव्हिड-१९ ची चाचणी करुन घ्यावी.

१५. स्थानिक प्राधिकरणाने कोव्हीड १९ च्या वाढत्या प्रसाराबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करणेसाठी वर्तमानपत्रातुन व प्रसार माध्यमाद्वारे प्रचार करण्यात यावा.

Scanned with CamScanner

तरी दिनांक १६ फेब्रुवारी २०२१ रोजी झालेल्या राज्यस्तरीय दुरचित्रवाणी परिषदेत निर्देशित केल्याप्रमाणे जिल्हयातील सर्व संबधित पोलीस व प्रशासकीय विभाग प्रमुखांनी या आदेशाची काटेकोर अंमलबजावणी करावी.

सदर आदेशाचा भंग करणाऱ्या कोणत्याही व्यक्ती, संस्था आणि संघटना यांनी उल्लवन केल्यास त्यांचे विरुदध आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ आणि साथरोग कायदा, १८९७ आणि या संदर्भातील शासनाचे इतर अधिनियम व नियमान्वये योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

सदर आदेशाची अंमलबजावणी दिनांक १८.०२.२०२१ पासून तात्काळ लागू करण्यात येत आहे.

जिल्हाधिकारी पुणे

(डॉ. राजेश देशमुख)
जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पुणे

प्रतः-
१. मा. संचालक, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, मंत्रालय, मुंबई-३२ यांना माहितीस्तन रायिगय सादर,
२. मा. विभागीय आयुक्त, पुणे विभाग पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर

प्रत- आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
१. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
२. पोलीस अधीक्षक, पुणे यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
३. उपवनसंरक्षक, पुणे यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
४. जिल्हा शल्य चिकित्सक, पुणे यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
५. जिल्हा आरोग्य अधिकारी, पुणे यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
६. अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, पुणे यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
७. जिल्हा क्रिडा अधिकारी, पुणे यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
८. जिल्हा प्रशासन अधिकारी, न. पा. प्र.जि. का. पुणे, यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
९. जिल्हा माहिती अधिकारी, पुणे यांना व्यापक प्रसिध्दीसाठी
१०. INCIDENT COMMANDER तथा उपविभागीय दंडाधिकारी सर्व जिल्हा पुणे यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
११. उपमुख्य कार्यकारी अधिकारी, ग्रा..जि. प. पुणे यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
१२. सहाय्यक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, पुणे यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
१३. असिस्टंट इंन्सिडंट कमांडर तथा तासुका दंडाधिकारी सर्व जिल्हा पुणे यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
१४. गट विकास अधिकारी सर्व जिल्हा पुणे यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
१५. मुख्य कार्याकारी अधिकारी छावणी परिषद, मुख्याधिकारी सर्व नगर परिषद, नगरपालिका, नगर पंचायत जिल्हा पुणे यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
१६. सर्व संबंधितास आस्थापना प्रमुख यांना यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अनुपालनास्तव,

Scanned with CamScanner